ॲनाचा गुप्त मित्र

योरिको त्सुत्सुई, चित्रांकन: अकीको हयाशी

पण लवकरच तिला सामान उघडण्याचा आणि पसारा आवरण्याचा कंटाळा आला आणि तिला तिच्या जुन्या मित्रांची आठवण येऊ लागली. मग एक विचित्र गोष्ट घडू लागली: कोणीतरी ॲनासाठी लहान भेटवस्तू आणि पत्रे पाठवू लागले. तो गुप्त मित्र कोण होता?

ॲनाचा गुप्त मित्र

योरिको तसुतसुई

चित्रांकन: अकीको हयाशी

मराठी: अश्विनी बर्वे

ॲना नवीन शहरातील नवीन घरात राहायला जाण्यासाठी खूप उत्सुक होती. ती डोंगरांच्या जवळ राहणार होती, याचा तिला विशेष आनंद झाला होता. पण तिला तिच्या जुन्या मित्रांची आठवण येऊ लागली.

तरीही, तिला दुसऱ्या कशाचाही विचार करायला वेळ नव्हता, कारण नवीन घरात खूप पेट्या आणायच्या होत्या.

लवकरच घरातली प्रत्येक खोली खोक्यांनी भरून गेली. ॲना सामान लावण्यात मदत करू लागली, पण लवकरच तिला कंटाळा आला आणि ती थकली.

अचानक तिला एक अस्पष्ट 'टिक-टिक' असा आवाज ऐकू आला. तो पुढच्या दारातून येत होता."मी पोस्टमनचा आवाज ऐकला," ॲना म्हणाली.

"मला नाही वाटत तो पोस्टमन होता," तिची आई म्हणाली.

"आपण अजून कोणालाही आपला नवीन पत्ता सांगितलेला नाही," तिचे वडील म्हणाले.

"पण मी खरंच कोणाचा तरी आवाज ऐकला," ॲना म्हणाली आणि बघायला गेली.

दारापाशी पोहोचल्यावर ॲनाच्या लक्षात आले की तिच्या आई-वडिलांचा अंदाज बरोबर होता. तिथे पत्र नव्हते, पण जांभळ्या फुलांचा एक सुंदर छोटा गुच्छ जमिनीवर पडलेला होता.

एवढी सुंदर फुले तिथे कशी आली? ती कोणी आणली असतील याचा विचार करत, ती कोण घेऊन आले आहे हे पाहण्याच्या आशेने ॲनाने पटकन दार उघडले. पण बाहेर तिला फक्त एक अनोळखी रस्ता आणि तिने यापूर्वी कधीही न पाहिलेली अनेक माणसे दिसली.

दुसऱ्या दिवशी सकाळी, ॲनाची आई पुन्हा सामान लावू लागली. "काल आपल्याला ती जांभळी फुलं कोणी दिली हे मला कळत नाहीये," ती म्हणाली. त्याच क्षणी, ॲनाला पुन्हा तोच अस्पष्ट 'टिक-टिक' आवाज ऐकू आला.

अॅना धावत दाराकडे गेली. यावेळी, पत्रपेटीत गुलाबाची तीन फुले होती. तिने ती काळजीपूर्वक बाहेर काढली आणि दार उघडले. पण पुन्हा एकदा, रस्त्यावर तेच अनोळखी लोक ये-जा करत होते.

दुसऱ्या दिवशी, ॲना तिच्या आईसोबत बाजारात गेली. नवीन दुकानांमध्ये जाताना आणि अनोळखी लोकांना पाहताना तिला विचित्र वाटत होते.

तिचे जुने मित्र तिच्यासोबत असते तर बरे झाले असते, असे तिला वाटले.

"ते भव्य पर्वत बघ," तिची आई म्हणाली."मला खात्री आहे की आपल्याला या शहरात राहायला खूप आवडेल."

"तुला काय वाटतं, ही गुलाबाची फुलं कोणी ठेवली असतील?" ॲनाने विचारले.

"कदाचित ती फुलं या घरात आधी राहणाऱ्या मुलीसाठी असतील," तिची आई म्हणाली."कदाचित तिच्या मैत्रिणींना माहीत नसेल की ती दुसरीकडे राहायला गेली आहे."

दुसऱ्या दिवशी घराची दुरुस्ती जवळजवळ पूर्ण झाली होती, पण ॲनाची आई अजूनही कामात व्यस्त होती. ॲनाने एका जुन्या मैत्रिणीला पाठवण्यासाठी एक चित्र काढले.

"मैत्रिणीशिवाय खेळण्यात काही मजा नाही," ती दुःखाने म्हणाली.

तेवढ्यातच तिला तो हळुवार 'टिक-टिक' आवाज पुन्हा ऐकू आला.

ॲना पत्रपेटीकडे धावत गेली. ह्या वेळी आत एक पत्र होते. पाकिटावर नाव लिहिलेले नव्हते. आत तिरप्या अक्षरात एक छोटा संदेश लिहिलेला होता.

“मित्र असणं
चांगलं असतं.
मी तुझी वाट पाहीन”.

ॲना ते पत्र पुन्हा पुन्हा वाचत राहिली आणि विचार करू लागली, “हे पत्र फक्त माझ्यासाठीच आहे.”

ॲनाला तिच्या नवीन शाळेत जायला खूप आवडले. एका मनमिळाऊ शिक्षिकेने तिला खेळणी दाखवली आणि टेकड्यांखाली असलेल्या खेळाच्या मैदानाबद्दल सांगितले, जिथे मुले कधीकधी खेळायला जात असत.शिक्षिका म्हणाल्या, "तुला लवकरच खूप नवीन मित्र-मैत्रिणी मिळतील.“ ॲना खेळाच्या मैदानावर हसणाऱ्या आणि बोलणाऱ्या मुलांना पाहत होती. तिला आशा होती की त्यांच्यापैकी कोणीतरी तिला पत्र पाठवले असेल.

"जांभळी फुले, निशिगंधाची फुले, एक पत्र...
जांभळी फुले, निशिगंधाची फुले, एक पत्र..." ॲना एकटीच गोट्या खेळत गुणगुणत होती. तिला कोणासोबत तरी खेळण्याची तीव्र इच्छा होती.तेवढ्यातच, तिला पुढच्या दारातून पुन्हा तो अस्पष्ट 'टिक-टिक' आवाज ऐकू आला.

"थांबा! थांबा!" ॲना दाराकडे धावत जात, मोठ्याने ओरडली.

तिला मेलबॉक्समधून काहीतरी बाहेर येताना दिसले.

ती एक खूप सुंदर कागदी बाहुली होती.

ॲनाने बाहुली उचलली आणि लगेच दार उघडले.

तिला एक लहान मुलगी फाटकाबाहेर जाताना दिसली.

"थांब! थांब!" ॲना पुन्हा ओरडली.

ती लहान मुलगी हळूच मागे वळली.

तिचे गाल लाल होत होते.

ॲना वाटेने चालत तिच्याजवळ गेली. “ती जांभळी फुलं... ती माझ्यासाठी होती का?” तिने विचारले.

त्या लहान मुलीने होकारार्थी मान डोलावली.“आणि... आणि ते पत्र? तेही माझ्यासाठीच होतं का?” ॲनाने विचारले.

त्या लहान मुलीने पुन्हा होकारार्थी मान डोलावली.

ॲनाने तिच्या हातातल्या सुंदर कागदी बाहुलीकडे पाहिले. सगळं काही तिच्यासाठीच होतं.

ती लहान मुलगी संकोचून, अगदी हळू आवाजात म्हणाली, “तू माझ्यासोबत खेळशील का?”

यावेळी ॲना हसली आणि होकारार्थी मान डोलावली.त्या दोन्ही मुली आनंदाने हसल्या आणि एकत्र खेळायला निघून गेल्या.